# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/06/2023 (शुक्रवार) सकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर मौजा बुट्टीबोरी प्रभाग क्र. ५ येथे दिनांक २८/०६/२०२३ ते २९/०६/२०२३ चे ०९.०० वा. ते सकाळी ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजु रामचंद्र देव्हारे, वय ४२ वर्ष रा. प्रभाग क्र. ५ बुट्टीबोरी हे पेरणी करीता नक्षी ता. भिवापुर येथे गेले असता फिर्यादी यांच्या मुलाने फोन करून सांगीतले की घराचे दरवाज्याला लावुन असलेले कुलुप तुटुन आहे व कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसत असल्याचे सांगीतल्याने फिर्यादी यांनी घरी येवुन बघीतले असता कपाटात ठेवलेले सोन्याचांदीचे दागीन्याची पाहणी केली असता कपाटात ठेवलेले १) सोन्याचे कानातले झुमके ७ ग्रॅम किंमती अंदाजे १७५००/— रू. २) सोन्याचे कानातले झुमके ५ ग्रॅम किंमती अंदाजे १२५००/— रू ३) सोन्याची बदामी अंगठी ५ ग्रॅम किंमती अंदाजे १२५००/— रू. ४) सोन्याची अंगठी ३ ग्रॅम किंमती अंदाजे ७५००/—रू. ५) सोन्याची नथ ३ ग्रॅम ७५००/— रू ६) सोन्याचे कानातले रींग १ ग्रॅम २५००/— रू ७) चांदीची तोरडी ३ तोळे किंमती १५००/— रू. ८) चांदीचे जोडवे १ तोळा किंमती ५००/— रू. ९) चांदीचा चाबीचा कंबरेचा झुमका १ तोळा किंमती ५००/— रू व नगदी १०००/— रू. असा एकुण ६३५००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक साखरकर मो. नं. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ग्रामपंचायत पाणी पुरवठा विहार कळमेश्वर तह. कळमेश्वर येथे दिनांक २८/०६/२०२३ ते दिनांक २९/०६/२०२३ चे ०७.०० वा. सुमारास ग्रामपंचायत लोणारा येथील विहीरीच्या पाणी पुरवठयाची पाण्याची विहीरीतील मशीन चपराशी नामे— अशोक विठोबाजी गवळी यांनी मशीन बंद करून गेटला ताला लावुन घरी गेले. दि. २९/०६/२०२३ रोजी ग्रामपंचायत लोणारा येथील चपराशी अशोक गवळी हे सकाळी ०७/०० वा. मशीन चालु करण्याकरीता गेले असता त्यांना पाणी पुरवठा विहीरीचा रूमचा ताला तुटलेला दिसला त्यांनी आत जावुन पाहीले असता तेथे १२ लोखंडी १/२ इंच १० फुट पाईप १००००/— रूपये १ पाण्याची मोटार किंमती अंदाजे १२०००/— रूपये व ६ लोखंडी गेट ६ फुटाचे किंमती अंदाजे ४०,०००/—रू. असा एकुण ६२,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार लोही मो. नं. ९१४६४२२६३३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर